# सुरेल स्वरयात्री : डॉ. भारती वैशंपायन

**मैफलीची सुरुवात शुद्धकल्याण रागाने होते. 'एरी माई पिया' ही एकतालाच्या संथ अशा लयीने अतिशय दिमाखात चालणारी बंदिश जेव्हा पुन्हा समेवर येते, त्यावेळी प्रेक्षकांमधून हलकेच 'वा! क्या बात!' अशी दाद ऐकू येते. ही दाद स्मितहास्याने स्वीकारून मैफलीचा ताबा मंचावरील 'ती' गायिका घेते. हे दृश्य आणि तो अनुभव अनेक रसिक व आमच्यासारख्या विद्यार्थ्यांनी गेली कित्येक वर्षे घेतला. रसिकांच्या मनाचा ताबा घेणाऱ्या थोर गायिका म्हणजे आमच्या सर्वांच्या 'बाई' अर्थात डॉ. भारती वैशंपायन. रंगलेली मैफल अर्धवट सोडून जाऊन त्यांना १९ जानेवारीला एक वर्ष होत आहे. त्यांच्या स्मृतींना दिलेला उजाळा.**

**- डॉ. विनोद ठाकूरदेसाई**



डॉ. भारती वैशंपायन

बाईंच्या स्वभावाचे अनेक पैलू होते. असे म्हणतात, की कलाकाराचा स्वभाव त्याच्या गाण्यामध्ये उतरतो. बाईंचा स्वभाव जेवढा मधुर, प्रेमळ, तेवढं त्यांचं गाणंही मधुर, कधी हळवं, भावनेने ओथंबलेलं तर कधी आक्रमक होतं. मुळात अतिशय सकारात्मक, धाडसी असणाऱ्या बाई तेवढ्याच हळव्या, कुटुंबवत्सल, धार्मिक आणि श्रद्धाळू होत्या. त्यांचे कर्तृत्व कोल्हापूरची संगीतपरंपरा जोपासण्यात मोलाचे आहे.

१९८४ मध्ये तत्कालीन संगीतप्रेमींच्या प्रयत्नांतून शिवाजी विद्यापीठाचा संगीत विभाग सुरू झाला. त्याचे उद्‌घाटन जयपूर घराण्याचे थोर गायक पंडित मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या हस्ते झाले होते. या संगीत विभागाच्या पहिल्या प्राध्यापिका म्हणून बाईंची नेमणूक झाली आणि पुढे ३० वर्षे त्यांनी कर्तृत्वाने हा विभाग मोठा केला; मात्र त्याचे श्रेय त्यांनी स्वतःकडे कधीही घेतले नाही. विद्यापीठाच्या संगीत विभागात त्यांनी आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या अनेक कलाकारांना निमंत्रित केले. पंडित भीमसेन जोशी, राजन-साजन मिश्रा, जसराज, रामनारायण, पंडिता गानसरस्वती किशोरी आमोणकर, वीणा सहस्रबुद्धे, अश्विनी भिडे-देशपांडे या आणि अशा अनेक कलाकारांनी संगीत व नाट्यशास्त्र विभागाची राजर्षी शाहू संगीत रजनी गाजवली.

बाई मूळच्या सांगलीच्या! ताम्हणकर! वडील आणि भाऊ जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलर. घरातील सर्वांना गाण्याची आवड. पुढे बाईंना गाण्याची आवड असणारे सासर मिळाले. त्यामुळे त्यांच्या गाण्याला नेहमीच कुटुंबाकडून प्रोत्साहन मिळाले. त्यांचे सासरे तसेच त्यांचे पती अविनाश वैशंपायन यांनी त्यांना गाण्यासाठी पाठबळ दिले. बाईंचा मुलगा केदार उत्तम तबलावादक! आईच्या शेवटच्या मैफलीपर्यंत त्याने तबल्याची अतिशय रंगतदार संगत केली. दोन्ही मुली मीरा व मधुरा यांनाही बाईंकडून गाण्याची उत्तम तालीम मिळाली. त्यांची सून शीतलसुद्धा उत्तम गाणारी आहे. 'कुटुंब रंगले गाण्यात' अशा सुंदर वळणावर बाईंचे असे अचानक निघून जाणे क्लेशदायी.

शालेय वयात त्यांनी सांगलीचे पंडित चिंतुबुवा म्हैसकर यांच्याकडे संगीताची तालीम सुरू केली. बालगंधर्व स्पर्धेतील त्यांच्या गाण्याची पु. ल. देशपांडे व पंडित भीमसेन जोशी यांनी खूप प्रशंसा केली होती. सांगलीतच त्यांनी बी.कॉम.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केलं. काही काळ नोकरीही केली. १९७६ मध्ये त्यांना भारत सरकारची संगीत शिक्षणासाठीची शिष्यवृत्ती मिळाली आणि कोल्हापूरचे पंडित सुधाकरबुवा डिग्रजकर यांच्याकडे त्यांचे संगीत शिक्षण सुरू झाले. सुधाकरबुवांनी त्यांना ख्याल गायकीबरोबरच उत्तमोत्तम ठुमऱ्या शिकवल्या. पुढे बाईंनी घम्मन खाँ यांचे शिष्य बाबूराव जोशी यांच्याकडून उपशास्त्रीय संगीताची तालीम घेतली. त्यानंतर पंडित निवृत्तीबुवा सरनाईक, पंडित मल्लिकार्जुन मन्सूर, पंडित यशवंतबुवा जोशी अशा दिग्गज गायकांकडून बाईंनी अनेक वर्षे तालीम घेतली. त्या आकाशवाणीच्या टॉप ग्रेड आर्टिस्ट होत्या. सवाई गंधर्व महोत्सवासह अनेक महोत्सवांत त्यांनी स्वराभिषेकाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरवण्यात आले.

बाईंचा प्रत्यक्ष मैफल सजविण्यात हातखंडा होता. हुकमी लागणारा आवाज, रागाचा आटोपशीरपणा, ठुमरी, दादरा या उपशास्त्रीय संगीतावर असणारी त्यांची पकड व त्या प्रकारांचे उत्तम सादरीकरण यामुळे मैफल जमवायला त्यांना फार वेळ लागत नसे. 'याद पिया की....' असे अनेक उपशास्त्रीय संगीत प्रकार, तर 'माळ पदक विठ्ठल, दावा मजसी यशोदेचा सुकुमार' या गाण्याची बाईंकडून उत्तम तालीम मिळाली आहे. अशा अनेक गाण्यांनी सजलेली त्यांची मैफल असे. पण म्हणतात ना, की काळापुढे कोणाचेच चालत नाही. ही सजलेली मैफल अशीच अधुरी सोडून त्यांना जावं लागलं. त्यांच्या प्रथम स्मृतिदिनी त्रिवार वंदन!

# अभियांत्रिकीत प्रात्यक्षिक प्रभावशाली

## डॉ. अरुण पाटील यांनी संशोधनातून केले सिद्ध

**आम्ही कोल्हापुरी**

**नंदिनी नरेवाडी-पाटोळे :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : बदलत्या काळात शिक्षणाच्या पद्धतीही बदलत आहेत. कालानुरूप व सुसंगत अशा शिक्षण पद्धतीचा अवलंब अनेक देश करतात. अभियांत्रिकी क्षेत्रातही अशाच पद्धतीच्या शिक्षणाविषयी संशोधन होत आहे. अभियांत्रिकीच्या बदलत्या शिक्षण पद्धतीत कोल्हापुरातील डॉ. अरुण पाटील यांनी नावलौकिक प्राप्त केला आहे.

अभियांत्रिकीचे शिक्षण चार भिंतींच्या आत देण्यापेक्षा प्रोजेक्ट अँड डिझाईन बेस्ड शिक्षण हे अधिक प्रभावशाली असल्याचे त्यांनी संशोधनात सिद्ध केले आहे. तसेच नामांकित विद्यापीठातून हे



**डॉ. पाटील**

प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले आहे.

डॉ. पाटील हे कुरकली (ता. कागल) चे. शिवाजी विद्यापीठातून इलेक्ट्रॉनिक्स या विषयातून एमएस्सीचे शिक्षण घेतले. सांगली येथील वालचंद अभियांत्रिकी महाविद्यायातील १० वर्षांच्या अध्यापनाच्या अनुभवानंतर त्यांना युनेस्कोने पीएचडीसाठी स्कॉलरशिप प्रदान केली. या स्कॉलरशिपवर त्यांनी ऑस्ट्रेलियातील मेलबर्न मोनॅश विद्यापीठातून अभियांत्रिकी शिक्षण नेमक्या कोणत्या पद्धतीतून शिकवावे, तसेच 'अभियांत्रिकी क्षेत्रातील शिक्षण पद्धतीतील बदल' या विषयावर संशोधन केले. ऑस्ट्रेलियासह एशिया आणि युरोपमधील काही देशांतील अभियांत्रिकी क्षेत्रातील शिक्षण देणाऱ्या विविध विद्यापीठांसाठी त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या या संशोधनामुळे अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम कसा असावा आणि कसा अमलात आणावा, यासाठी विविध देशांत रोल मॉडेल उभे केले आहे.

### डॉ. पाटील यांची इतर कामगिरी

- सेंट्रल क्वीन्सलँड विद्यापीठाचे डेप्यूटी डीन पदावर काहीकाळ कार्यरत
- ऑस्ट्रेलियातील डिकीन युनिव्हर्सिटीचे पदव्युत्तर विभागप्रमुख
- अमिटी युनिव्हर्सिटीमध्ये कुलगुरू पदावर काहीकाळ कार्यरत

तरुण भारत



- महानगरपालिकेचा प्रकल्प
- ४ किलो मीटरचा असणार आहे ट्रॅक
- २८ लाख रूपयांचा प्रस्ताव डीपीटीसीकडे सादर

# शिवाजी विद्यापीठासमोरील रस्त्यावर साकारतोय

# सायकल ट्रॅक

संग्राम काटकर

कोल्हापूर

एकेकाळी दैनंदिन कामासाठी वापरल्या जाणाऱ्या सायकलकडे आता बदलेल्या काळात आरोग्य तंदुरूस्तीच्या दृष्टीने पाहिले जाऊ लागले आहे. स्नायूंच्या बळकटीसाठी सायकलिंग करणे हा एक उत्तम आणि प्रभावी व्यायाम प्रकार ठरला आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकांना वाढलेले वजन कमी करण्याबरोबरच उत्तम आरोग्यासाठी सकाळी सायकलिंग करायचे आहे. त्याच्यासाठी आता महापालिकेच्या वतीने ४ किलो मीटरचा सायकल ट्रॅक केला जाणार आहे. त्यासाठी शिवाजी विद्यापीठसमोरील पोस्ट कार्यालय ते डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी (डीओटी) आणि डीओटीसमोरील रस्ता ते पुन्हा पोस्ट ऑफीस हा रस्ता निवडला आहे.

या ट्रॅकसाठी नाविण्यपूर्ण योजनेअंतर्गत २८ लाख रूपये खर्चाचा तयार केलेला प्रस्ताव महापालिकेने दोन आठवड्यांपूर्वी जिल्हा नियोजन समितीकडे दिला आहे. सायकल ट्रॅकसाठी नियोजन समितीकडून निधी मंजूर झाला की लगेचच सार्वजनिक बांधकाम विभागाशी (पीडब्ल्यूडी) संपर्क साधून शिवाजी विद्यापीठसमोरील रस्त्यावरील दोन्ही बाजूंच्या फुटपाथच्या आतील ६ ते ७ फुटांपर्यंतची जागा मनपा ताब्यात घेणार आहे. या जागेवर डांबरीकरणाचा ट्रॅक करण्यात येणार आहे. या ट्रॅकवरून सायकलिंग करणाऱ्या लोकांना नजिकच्या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या मोठ्या वाहनांचा धोका पोहचू नये म्हणून ट्रॅकला लोखंडी बॅरिकेटस् लावली जाणार आहेत. या ट्रॅकवर एक व्यायाम म्हणून सायकलिंग करणाऱ्या लोकांसोबत विविध सायकलिंग स्पर्धेसह जागतिक पातळीवरील वर्ल्ड आयर्न मॅन चॅंम्पियनशीपमध्ये सहभागी होणाऱ्या सायकलपटूंनाही सराव करणे सोपे जाणार आहे. हा सराव पूर्णपणे सुरक्षित असणार आहे. दुसरे म्हणजे स्पर्धेच्या सरावासाठी रोज २० ते ३० किलोमीटर सायकलिंग करण्यासाठी शहरापासूनच्या परिसरातील गावांकडे जावे लागणार नाही, असे महापालिकेचे शहर अभियंता नेत्रदीप सरनोबत यांनी सांगितले.



### रोज १ तास सायकलिंग करा...

गेल्या दोन दशकांपासून घरोघरी दुचाकी, चारचाकी गाड्या आल्या आणि सायकलींचा वापरच संपला. जवळच्या अंतरावरील कामांसाठीही गाडीचा वापर होत आहे. त्यामुळे माणसाचे वजन वाढण्याच्या काही कारणांपैकी गाडीचा वापर हेही एक कारण ठरले आहे. मग वजन घटविण्याबरोबरच उत्तम आरोग्यासाठी लोक सायकलिंग करू लागले. आजही शेकडो लोक रोज सकाळी पन्हाळा, शिवाजी विद्यापीठ, कळंबा, सानेगुरूजी वसाहत आणि फुलेवाडी या रोडवरून सायकलिंग करताना दिसतात. आता त्यांनी नियोजन करून रोज सकाळी किमान १ तास सायकलिंग करणे आवश्यक आहे. असे केले तर शरीरातील कॅलरीज बर्न होऊन वाढलेले वजन कमी होईलच, शिवाय उत्तम आरोग्यही लाभले.

**डॉ. सुनील पाटील ( शिवाजी पेठ, आठ नंबर शाळा)**

### रोज सायकलिंग केल्याने होणारे फायदे असे...

- फुफ्फुस आणि हृदयाची कार्यक्षमता सुधारते.
- चढतीवर २० मिनिटे सायकलिंग केल्याने स्नायूंना बळकटी येते.
- वेगात सायकल चालवल्यास शरीरातील अधिकच्या कॅलरीज जळण्यास मदत होते.
- माणसाचा मूड नेहमी फ्रेश राहतो.
- वाढलेले वजन कमी होऊन रक्तदाब आणि मधुमेह नियंत्रणात राहतो.

# शिवाजी विद्यापीठ परिसरात साळींदरसह दुर्मीळ प्रजाती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात १२३ पृष्ठवंशीय पशुपक्ष्यांच्या प्रजातींची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये सस्तन प्राण्यांच्या एकूण ९ प्रजाती नोंदविण्यात आल्या असून, वटवाघळाच्या तीन प्रजातींसह साळिंदराच्या एका प्रजातीची नोंदही करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम'अंतर्गत प्राणीशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांच्याकडून गेल्या वर्षभरात प्रकल्पांतर्गत ही नोंदणी करण्यात आली. या संशोधनाचा अहवाल विद्यापीठास सादर करण्यात आला आहे. या अहवालानुसार विद्यापीठ परिसराच्या जैवविविधतेला मोठी पुष्टी लाभली आहे.

शिवाजी विद्यापीठाने 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम' अधिविभागातील संशोधकांसाठी घोषित केली आहे. या योजनेअंतर्गत 'स्टडीज ऑन डायव्हर्सिटी ऑफ व्हर्टिब्रेट्स इन द शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस, कोल्हापूर (महाराष्ट्र, इंडिया)' हा प्रकल्प डॉ. एस. एम. गायकवाड यांना मंजूर करण्यात आला होता. त्या अंतर्गत डॉ. गायकवाड यांनी शिवाजी विद्यापीठ परिसरात सरिसृप, उभयचर, पक्षी आणि सस्तन अशा चार प्रकारांत त्यांची विभागणी करून नोंदी घेण्यात आल्या. सरिसृप वर्गाच्या एकूण १३ प्रजाती विद्यापीठात आढळून आल्या. त्यात तस्कर (कॉमन ट्रिंकेट स्नेक) या दुर्मीळ प्रजातीचा सापही परिसरात आढळला. सरडे व पालींच्या सहा प्रजाती व कासवाची एक प्रजात आढळून आली. विद्यापीठ परिसरात पक्ष्यांच्या सुमारे ९० प्रजाती आढळल्या आहेत. त्यात थापट्या बदक, शुवई बदक, ब्राह्मणी बदक, छोट्या कंठाचा चिखल्या व स्वर्गीय नर्तक या पाच स्थलांतरित प्रजातींसह तीन स्थानिक स्थलांतरित प्रजाती आढळल्या.

या प्रकल्पाच्या अनुषंगाने माहिती देताना संशोधक डॉ. एस. एम. गायकवाड म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा परिसर जैवविविधतेने किती समृद्ध आहे, याची प्रचिती या प्रकल्पाचे काम करताना आली. विद्यापीठाने प्रदान केलेल्या रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीममुळेच हे संशोधन करणे शक्य झाले. याबाबत कुलगुरू डॉ. प्रा. डी. टी. शिर्के म्हणाले, रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम ही विद्यापीठातील संशोधकांना उपयुक्त संशोधनासाठी प्रेरित करणारी योजना असल्याचे या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. शिवाजी विद्यापीठाचा परिसर हा जैवविविधतेने समृद्ध आहे.

# ऑनलाईन पात्रता अर्ज भरण्यास मुदतवाढ

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पात्रता अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. काही विद्यार्थ्यांनी पात्रता अर्ज भरले नसल्याचे निदर्शनास आले आहे. याच्या अंतिम

■ **कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची माहिती**

तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत अशी माहिती परिपत्रकाव्दारे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे. सर्व पदवी अभ्यासक्रमासाठी विशेष विलंब शुल्कासह ३० जानेवारीपर्यंत शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी ३२५ रूपये, अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी ७०० रूपये, परदेशी विद्यार्थ्यांसाठी ९०० रूपये भरून पात्रता अर्ज भरावयाचा आहे. सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३० जानेवारीपर्यंत विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी ५० रूपये, अन्य विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी १०० रूपये, परदेशी विद्यार्थ्यांसाठी ५०० रूपये भरून पात्रता अर्ज भरावयाचा आहे.

# शिवाजी विद्यापीठ परिसरात स्वर्गीय नर्तक, बोनेल्स ईगल

## १३ सरिसृप, ११ उभयचर, ९ सस्तन प्रजाती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात स्वर्गीय नर्तक, बोनेल्स ईगलसह १२३ पृष्ठवंशीय पशुपक्ष्यांच्या प्रजाती आढळून आल्या. विद्यापीठाच्या 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम'अंतर्गत प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. एस.एम. गायकवाड यांनी त्याबाबत संशोधन केले. त्यामुळे विद्यापीठ परिसराच्या जैवविविधतेला मोठी पुष्टी लाभली आहे.

विद्यापीठाने 'रिसर्च स्ट्रेन्दनिंग स्कीम' अधिविभागातील संशोधकांसाठी घोषित केली आहे. त्या योजनेअंतर्गत 'स्टडिज ऑन डायव्हर्सिटी ऑफ व्हर्टिब्रेट्स इन द शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस' हा प्रकल्प प्राणिशास्त्र अधिविभागातील डॉ. एस. एम. गायकवाड यांना मंजूर झाला. त्या अंतर्गत त्यांनी विद्यापीठ परिसरात सुमारे वर्षभर सातत्यपूर्ण पाहणी करून विविध पृष्ठवंशीय प्राणी व पक्ष्यांच्या नोंदी घेतल्या. सरिसृप, उभयचर, पक्षी आणि सस्तन अशा चार प्रकारांत त्यांची विभागणी करून नोंदी घेतल्या. त्यामध्ये सरिसृप वर्गाच्या एकूण १३ प्रजाती, सापांच्या एकूण सहा प्रजाती आढळल्या. त्यात तस्कर (कॉमन ट्रिंकेट स्नेक) या दुर्मीळ प्रजातीचा सापही परिसरात आढळला. त्याशिवाय सरडे व पालींच्या सहा, कासवाची एक, पक्ष्यांच्या सुमारे ९० प्रजाती आढळल्या आहेत. त्यात थापट्या बदक, शुवई बदक यांचा समावेश आहे.